नियमित दिवाणी मुकदमा क्र. ७९/१९९४
सहदेव वि. साऊथ कोकण बिसलरी
नि. १७५ लगत

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.२</u>**

**<u>नारायण सहदेव राणे</u>**

**<u>शपथेवर सुरु</u>**

**<u>पुढील उलटतपास प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री. एस. जी. पणदुरकर यांचेतर्फे</u>**

१८. मी सन १९७८ ते सन २०१५ पर्यंत प्रतिवादी कंपनीत कामाला होतो. माझ्या कामाची वेळ सकाळी ८.०० ते संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत होती. दुपारी १२.३० ते १.३० या वेळेत मी जेवणासाठी घरी जात होतो. हे म्हणणे खरे आहे की, दावा जमिनीत असलेला स्प्रे पॉड सन १९८६ साली बांधण्यास सुरुवात झाली व सन १९८८ मध्ये बांधुन पूर्ण झाला. हे म्हणणे खरे आहे की, दावा जमिनीत बॉयलर हाऊस आहे. हे म्हणणे खरे आहे की, १९८६ साली बॉयलर हाऊस बांधण्यास सुरुवात झाली व सन १९८७ मध्ये बांधून पूर्ण केले. दावा जमिनीत लगून आहे किंवा कसे याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा जमिनीला कंपाऊंड वॉल असून त्यावर वायर फेन्सींग केले आहे. कंपाऊंड वॉल बांधण्यास सन १९८९ मध्ये सुरुवात केली व १९९० मध्ये पूर्ण केली याची मला माहिती नाही. दावा जमिनीत ट्रान्सफॉर्मर होता किंवा कसे याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी कंपनीत लाईट होती. सदरची लाईट दावा जमिनीतील ट्रान्सफॉर्मर वरुन घेतली होती याची मला माहिती नाही. सदर ट्रान्सफॉर्मर १९९१ साली बसवला होता याची मला माहिती नाही. पॅनल बोर्ड व पॅनल हाऊस दावा जमिनीत आहे की नाही याची मला माहिती नाही. पॅनल हाऊस सन १९८९ व पॅनल बोर्ड १९९० मध्ये बांधले याची मला माहिती नाही. प्रतिवादी कंपनीला पोल्युशन कंट्रोल बोर्डाची मान्यता लागते किंवा कसे याची मला माहिती नाही. मी प्रतिवादी कंपनीविरुध्द कोल्हापूर येथे लेबर कोर्ट व इंडस्ट्रीयल कोर्टात केसीस दाखल केल्या होत्या. कोल्हापुर इंडस्ट्रीयल कोर्टात पोल्युशन कंट्रोल बोर्डाच्या मान्यतेबाबत मुद्दा उपस्थित केला होता याची मला माहिती नाही. प्रतिवादी कंपनीने दिनांक १३/२/१९९१ रोजीचे पोल्युशन कंट्रोल बोर्डाचे सर्टफिकेट हजर केले होते हे मला आठवत नाही. प्रतिवादी कंपनीचे चिफ इंजिनिअर श्री. वालावलकर होते हे मला माहिती नाही. दिनांक १६/१/१९८८ रोजी चिफ इंजिनिअर श्री. वालावलकर यांनी व्हॅल्युएशर रिपोर्ट देऊन स्प्रे पॉंडचे बांधकाम अंतिम टप्प्यात असल्याचे सांगितले होते याची मला माहिती नाही.

१९. प्रतिवादी कंपनीची लाईटची लाईल ११ केव्हीची आहे याची मला माहिती नाही. प्रतिवादी कंपनीचे बांधकाम सन १९९० साली पूर्ण झाल्याबाबत इन्सुली ग्रामपंचायतीने प्रमाणपत्र दिले होते याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी कंपनी माझ्या भावाला नोकरी देत नव्हती त्यामुळे माझ्या वडीलांना पुढे करुन प्रतिवादीविरुध्द प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांच्या व आमच्या संमत्तीने प्रतिवादी कंपनीने बांधकाम केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही स्वार्थासाठी कंपनीविरुध्द दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, तत्कालीन पुढारी यांना पुढे करुन मी कंपनीविरुध्द वेगवेगळया न्यायालयात केसेस दाखल केल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, अद्याप आमच्या बाजुने कोणत्याही केसमध्ये न्यायनिर्णय झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे सरतपासाचे शपथपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
सही/-

दिनांक - ३०/०४/२०२६

(जे. एम. मिस्त्री)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, सावंतवाडी.